**निशाणी ओ — १२**

MHIC240002812021

दाखल तारीख : ०३.१२.२०२१
नोंदणी तारीख : ०३.१२.२०२१
न्यायनिर्णय तारीख: ०७.०८.२०२६
कालावधी : ०४ वर्षे ०८ म. ०४ दि.

## सदस्य, औद्योगिक न्यायालय, लातूर यांचे न्यायालयात
## ( श.ज्ञा. बाऊचकर, सदस्य, यांचेसमोर )

**तक्रार (यु.एल.पी.) क्र. २२०/२०२१**

आत्माराम हरीबा बनसोडे,
वय — ६१ वर्षे, धंदा — सेवानिवृत्त,
रा. नागराज पेट्रोलपंपा जवळ, औसा,
ता. औसा, जिल्हा — लातूर. ... **तक्रारदार;**

**विरुध्द**

नगरपरिषद औसा,
मार्फत मुख्याधिकारी,
ता. औसा, जिल्हा—लातूर. ... **जाबदार.**

---

**दावा**

महाराष्ट्र श्रमिक संघटनांना मान्यता व अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध कायदा, १९७१ चे कलम २८(१) परिशिष्ठ—४ बाब — ९ व १० नुसार तक्रार.

---

**विधिज्ञ**

तक्रारदारातर्फे विधिज्ञ श्री जी.एस. पवार.
जाबदार तर्फे विधिज्ञ श्री बी.जी. कदम.

---

## न्यायनिर्णय

( दिनांक ०७/०८/२०२६ रोजी सांगितला व जाहीर केला )

१. तक्रारदाराचे कथन असे आहे की तो जाबदार नगरपरिषदेमध्ये वाहन चालक म्हणून नोकरीला होता. तक्रारदार दिनांक ३०/४/२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाला. जाबदार नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत औसा शहरातील जनतेच्या आरोग्य, पाणी, शिक्षण, रस्ते या व इतर मुलभूत गरजा निरनिराळे अधिकारी व कर्मचारी व कामगार नेमुन त्यांच्या सहकार्याने व सुसुत्र पध्दतीने पुर्ण केल्या जातात. तक्रारदाराला कामावर नेमणे, वेतन देणे, नोकरीत कायम करणे, बदली करणे वैगरे तदअनुषंगिक अधिकार जाबदार नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांना आहेत.

२. तक्रारदाराने पुढे असे नमुद केले आहे की त्याला जाबदार यांनी सेवानिवृत्त केल्यानंतर सेवानिवृत्तीचे फायदे — सेवानिवृत्ती उपदान, पेन्शन विक्री, रजा रोखीकरण या रक्कमा दिलेल्या नाही. तक्रारदार सेवानिवृत्त झाल्यामुळे वर नमुद लाभ मिळणेस पात्र आहे. परंतु जाबदार यांनी तक्रारदाराला त्याच्या सेवानिवृत्तीनंतर देय होणा—या लाभाच्या रकमा दिलेल्या नाहीत.

३. तक्रारदाराने पुढे असे नमुद केले आहे की, जाबदार यांनी त्याला दिनांक २०/१२/२०१९ च्या आदेशान्वये सेवानिवृत्त उपदानाची रक्कम रुपये ६,३३,०००/—, पेन्शन विक्रीची रक्कम रुपये ८,४७,८१५/— याप्रमाणे देय राहील असे कळविले आहे. त्याचप्रमाणे

दिनांक २२/१/२०२० रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम क्रमांक ६८ मधील तरतुदींनुसार व सदर आदेशातील संदर्भीय पत्र क्र. ५ प्रमाणे रजा रोखीकरणाची रक्कम रुपये ४,५९,९८०/— मिळणेस पात्र व हक्कदार आहे असे नमुद केले आहे. असे असतानाही जाबदार यांनी तक्रारदाराला सदरच्या रकमा दिलेल्या नाहीत. त्यामुळे तक्रारदाराने दिनांक ४/८/२०२१ रोजी विनंती अर्ज दिला. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारचे तद्‌वेळचे राज्यमंत्री श्री संजय बनसोडे यांनी देखील दिनांक ३०/११/२०२१ रोजी जाबदार नगरपरिषदेला पत्र दिले परंतु जाबदार नगरपरिषदेने त्याची दखल घेतली नाही. तक्रारदाराला देय असलेल्या रजा रोखीकरण, उपदान, पेन्शन याची एकुण रक्कम १९,४०,७९५/— असून सदरची रक्कम तक्रारदाराला दिनांक १/५/२०१९ रोजी देणे आवश्यक असताना जाबदार यांनी त्याप्रमाणे रक्कम दिलेली नाही. त्यामुळे जाबदार सदर रक्कमेवर द.सा.द.शे. १८ टक्के व्याज देण्यास जबाबदार ठरतात. तक्रारदाराला सेवानिवृत्ती वेतनाशिवाय उत्पन्नाचे दुसरे कसलेही साधन नाही. तसेच, कौटुंबिक कलहामुळे त्याला दरमहा उदरनिर्वाहाची रक्कम न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जिल्हा न्यायालयात भरावी लागत आहे. सदरची रक्कम वेळेत न भरणा झाल्यामुळे त्याच्यावर व्याजाचा भुर्दंड पडत आहे व तक्रारदार देय असलेले फायदे मिळण्यास पात्र व हक्कदार असतानाही त्याला जाबदार यांनी सदरचे फायदे दिलेले नाहीत.

४. तक्रारदाराने जाबदारविरुध्द अनुचित कामगार प्रथेचे हक्कज्ञापन मागणी करुन जाबदार यांचेविरुध्द त्यांनी तक्रारदाराला रजा

रोखीकरण, उपदान, पेन्शन विक्री रक्कम रुपये १९,४०,७९५/— व देय निवृत्ती वेतनाची रक्कम दिनांक १/५/२०१९ पासून १८ टक्के व्याजासह देण्याचा आदेश व्हावा अशी मागणी केली आहे.

५. जाबदार नगरपरिषदेने प्रकरणात हजर होवून निशाणी सी—४ कडे त्यांची कैफियत दाखल केली आहे. त्यामध्ये जाबदार नगरपरिषदेने असे नमुद केले आहे की त्यांनी कोणत्याही अनुचित कामगार प्रथेचा अवलंब केलेला नाही. तक्रारदार नियत वयोमानानुसार जाबदार नगरपरिषदेच्या सेवेतून दिनांक ३०/३/२०१९ रोजी सेवानिवृत्त झाला. त्याप्रमाणे तक्रारदार सेवानिवृत्त झाल्यापासून सेवानियमांतील तरतुदींप्रमाणे उपदानाची रक्कम, पेन्शन विक्रीची रक्कम व रजा रोखीकरणाची रक्कम मिळण्यास पात्र व हक्कदार आहे. जाबदार यांनी कबुल केले आहे की त्यांनी दिनांक २०/१२/२०१९ रोजीच्या आदेशान्वये तक्रारदाराला सेवानिवृत्त उपदानाची रक्कम रुपये ६,३३,०००/—, पेन्शन विक्रीची रक्कम रुपये ८,४७,८१५/— देय राहील असे नमुद केले आहे. त्याचप्रमाणे जाबदार यांनी हेही कबुल केले आहे की त्यांनी दिनांक २२/१/२०२० रोजीच्या आदेशान्वये तक्रारदार रजा रोखीकरणाची रक्कम रुपये ४,५९,९८०/— मिळण्यास पात्र व हक्कदार आहे. तक्रारदाराने सदरचे फायदे मिळण्याकरीता दिनांक ४/८/२०१९ रोजी विनंती अर्ज केला असता जाबदार यांनी त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाला पत्रव्यवहार करुन अनुदान मिळण्याबाबत विनंती केली आहे. त्या अनुषंगाने जाबदार यांच्या वरिष्ठ कार्यालयाला अनुदान प्राप्त नसल्यामुळे तक्रारदारास सेवानिवृत्तीचे फायदे देता आलेले नाहीत.

जाबदार नगरपरिषदेकडे निधी नसल्यामुळे तक्रारदाराला सेवानिवृत्तीचे फायदे देवू शकत नाही. तक्रारदार सेवानिवृत्तीच्या रक्कमांवर १८ टक्के व्याज मिळण्यास पात्र आहे ही बाब जाबदार यांनी नाकारली आहे. त्याचबरोबर तक्रारदाराच्या फायदयांची रक्कम जाबदार नगरपरिषद स्वत :च्या फायदयासाठी वापरत आहेत, तक्रारदाराला सेवानिवृत्तीच्या वेतनाशिवाय उत्पन्नाचे दुसरे साधन नाही, त्याला कौटुंबिक कलहामुळे दरमहा उदरनिर्वाहाची रक्कम जिल्हा न्यायालयात भरावी लागते, रक्कम वेळेत न भरणा झाल्यामुळे त्यावर व्याजाचा भुर्दंड पडत आहे, या बाबी नाकारलेल्या आहेत.

६. तक्रारदाराची तक्रार मुदतीत नाही. उपदान मागणी या न्यायालयात करता येणार नाही. जाबदार यांनी तक्रारदाराची तक्रार खर्चासहीत खारीज करण्यात यावी म्हणून विनंती केली आहे.

७. जाबदारांच्या कैफियतीनंतर निशाणी ओ—९ कडे तक्रारीच्या निर्णयाकरीता वादाचे मुद्‌दे निश्चित करण्यात आले. तक्रारदाराने निशाणी यु—२५ कडे त्याच्या सरतपासणीचे शपथपत्र दाखल केले आणि उलटतपासानंतर निशाणी यु—३४ कडील पुरशिसने पुरावा पुर्ण झाल्याचे कळविले. जाबदार नगरपरिषदेने त्यांचेतर्फे साक्षीदार म्हणून शिवकुमार मल्लीकार्जुन हिरेमठ यांची निशाणी सी—३० साक्ष नोंदविली आहे आणि त्यांच्या उलटतपासानंतर निशाणी सी—३७ कडील पुरशिसने पुरावा पुर्ण झाल्याचे कळविले. तक्रारदाराने निशाणी यु—४ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांना निशाणी क्रमांक देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे

तक्रारदाराने निशाणी यु—१४ व निशाणी यु—१९ सोबत याचिका क्र. ४०७५/२०२२ मधील आदेशाच्या प्रती हजर केल्या आहेत. जाबदार नगरपरिषदेने निशाणी सी—६, सी—२७ च्या यादीने कागदपत्र दाखल केली आहेत. जाबदार नगर परिषदेने निशाणी सी—९ सोबत याचिका दाखल असले बाबत संगणकीय प्रत दाखल केली आहे, आणि निशाणी सी—१५ सोबत सदर याचिकेची आणि त्यामधील दि. ०४/०४/२०२२ रोजीच्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. या आदेशाचे अवलोकन करता त्यामध्ये जाबदार नगर परिषदेने कामगार न्यायालयात अवमान याचिकेमध्ये रक्कम रु.२,००,०००/— जमा केल्याचा उल्लेख आहे. सदरची याचिका जाबदार नगर परिषदेने या न्यायालयाच्या निशाणी यु—२ कडील दि.०६/०१/२०२२ च्या आदेशाविरुध्द दाखल केल्याचे दिसुन येते.

८. तक्रादारातर्फे विधिज्ञ श्री जी.एस. पवार व जाबदार नगरपरिषदेतर्फे विधिज्ञ श्री बी.जी. कदम यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकण्यात आला.

९. निशाणी यु—९ कडील मुद्दे मराठीत अनुवादीत करुन पुढीलप्रमाणे न्यायनिर्णयाकरिता घेण्यात आलेले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढे नमुद करण्यात येत आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | तक्रारदार जाबदार यांनी महाराष्ट्र श्रमिक संघटनांना मान्यता व अनुचित कामगार प्रथा प्रतिबंध कायदा, | तक्रारदार जाबदार यांनी महाराष्ट्र श्रमिक संघटनांना मान्यता व अनुचित कामगार प्रथा प्रतिबंध कायदा, |

| | | |
|---|---|---|
| | १९७१ चे अनुसूची—४, बाब — ९ व १० मध्ये नमूद अनुचित कामगार प्रथांचा अवलंब केल्याचे शाबीत करतो का ? | १९७१ चे अनुसूची—४, बाब — ९ मध्ये नमूद अनुचित कामगार प्रथांचा अवलंब केल्याचे शाबीत करतो. |
| २ | तक्रारदार मागणी केलेली दाद मिळण्यास पात्र आहे का ? | नकारार्थी |
| ३ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १** —

१०. तक्रारदाराने प्रस्तुत तक्रारीत त्याला सेवानिवृत्तीचे फायदयांची रक्कम जाबदार यांनी दिली नाही म्हणून जाबदार यांचेविरुध्द अनुचित कामगार प्रथेचे हक्कज्ञापन होवून तशा कायदेशीर रक्कमा जाबदार यांनी तक्रारदाराला देण्याचा आदेश व्हावा म्हणून मागणी केली आहे.

११. तक्रारदार दिनांक ३०/४/२०१९ रोजी जाबदार नगरपरिषदेच्या नोकरीतून सेवानिवृत्त झाला, याबाबत वाद नाही. जाबदार नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी नगरपरिषदेच्या लेखापाल यांना दिनांक २०/१२/२०१९ रोजी (निशाणी यु—३१) आदेश केला आणि कळविले की तक्रारदार दिनांक ३०/४/२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्याला सेवानिवृत्ती वेतन व इतर लाभ मंजूर करण्यात येत आहेत. या आदेशाप्रमाणे निवृत्तीवेतन दिनांक १/५/२०१९ पासून मुळ निवृत्तीवेतन रुपये २१,१००/— व त्यावर इतर भत्ते याप्रमाणे देय राहील, सेवानिवृत्ती उपदान रुपये ६,३३,०००/— याप्रमाणे देय राहील, पेन्शन विक्रीची रक्कम रुपये

८,४७,८१५/— देय राहील असे नमुद आहे. त्याचप्रमाणे जाबदार नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांनी दिनांक २२/१/२०२० रोजी त्यांचे लेखापाल यांना आदेश (निशाणी यु—३२) काढुन कळविले की तक्रारदाराची रजा रोखीकरणाची रक्कम रुपये ४,५९,९८०/— इतकी आहे आणि ती त्याप्रमाणे त्याला मंजूर करण्यात येत आहे. अशाप्रकारे जाबदार यांनी तक्रारदाराला सेवानिवृत्तीचे लाभ मंजूर केले परंतु प्रत्यक्षात तक्रारदाराला ती रक्कम अदा केली नाही. त्यामुळे तक्रारदाराने दिनांक ८/१/२०२० रोजी जाबदार यांना अर्ज (निशाणी यु—२६) देवून रजा रोखीकरणाच्या रकमेची मागणी केली. त्याचप्रमाणे तक्रारदाराने दिनांक १६/९/२०२० च्या अर्जाने (निशाणी यु—२७) रजा रोखीकरण, निवृत्ती वेतन आणि पेन्शन विक्री या रकमांची मागणी केली. तक्रारदाराने ९/१२/२०२० रोजी देखील पत्र (निशाणी यु—२८) देवून वरीलप्रमाणे मागणी केली. त्यानंतर तक्रारदाराने दिनांक ४/८/२०२१ रोजी पत्र (निशाणी यु—२९) देवून वरील रकमांची मागणी केली. तक्रारदाराला त्याच्या लाभाच्या रकमा अदा कराव्यात म्हणून तद्वेळचे महाराष्ट्र सरकारमधील राज्यमंत्री श्री संजय बनसोडे यांनी देखील जाबदार नगरपरिषदेला दिनांक ३०/१०/२०२१ रोजी पत्र (निशाणी यु—३०) दिले.

१२. जाबदार यांनी निशाणी सी—६/१ सोबत त्यांनी जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद प्रशासन, लातूर यांना अनुदान मिळणेसाठी दिलेल्या दि.१३/०१/२०२१ रोजीच्या पत्राची प्रत दाखल केली आहे. याच यादीने अ.नं. २ ला जिल्हाधिकारी कार्यालय लातूर,

नगरपरिषद प्रशासन विभाग यांनी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना दिलेल्या पत्राची प्रत दाखल केली असून त्यानुसार आस्थापना कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या रकमा अदा करण्यासाठी अनुदान मिळावे म्हणून विनंती केल्याचे दिसते.

१३. तक्रारदार दिनांक ३०/४/२०१९ रोजी सेवानिवृत्त झाला. जाबदार यांनी तक्रारदाराला सेवानिवृत्तीनंतर देय होणारे निवृत्ती वेतन, सेवानिवृत्ती उपदान, पेन्शन विक्रीची रक्कम, रजा रोखीकरणाची रक्कम अदा केली नाही हे वर नमुद पत्रव्यवहारावरुन स्पष्ट होते.

१४. कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याची कायदेशीर देणी विनाविलंब अदा होणे गरजेचे आहे. असे असतानाही जाबदार यांनी तक्रारदाराला त्याच्या सेवानिवृत्तीनंतर देय होणा—या कायदेशीर रकमा देण्यामध्ये विलंब केला आहे. त्यामुळे जाबदार यांनी तक्रारदाराच्या नोकरीला लागू असणा—या सेवाशर्तींचा भंग केलेला आहे आणि परिणामी महाराष्ट्र श्रमिक संघटनांना मान्यता व अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध कायदा, १९७१ चे कलम २८(१) परिशिष्ठ—४ बाब — ९ प्रमाणे अनुचित कामगार प्रथा केलेली आहे.

**मुद्दा क्र. २ —**

१५. तक्रारदाराने प्रस्तुत प्रकरणात निशाणी यु—२ कडे अंतरिम आदेशाकरीता अर्ज दाखल केला असता त्या अर्जावर दिनांक ६/१/२०२२ रोजी आदेश होवून जाबदार यांनी तक्रारदाराला सेवानिवृत्तीच्या फायदयापोटी रक्कम रुपये १०,००,०००/— एक

महिन्याच्या आत अदा करावी असा आदेश केला. या आदेशानंतर जाबदार यांनी निशाणी सी–१० प्रमाणे या न्यायालयात रक्कम रुपये २,००,०००/– डी.डी. क्र. २६१०७४ दिनांक २/३/२०२२ अन्वये जमा केली असता सदरची रक्कम तक्रारदाराला निशाणी यु–१० कडील त्याच्या मागणी अर्जावर दि.१५/०३/२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे दिनांक १५/०३/२०२२ च्या जावक क्र. १६६/२०२२ प्रमाणे अदा करण्यात आली. जाबदार यांनी निशाणी सी–१२ कडील दिनांक ०४/०४/२०२२ च्या अर्जाप्रमाणे या न्यायालयात रक्कम रु. २,००,०००/– धनादेश क्रं.०२२३१५ अन्वये जमा केली असता सदरची रक्कम तक्रारदाराला त्याच्या निशाणी यु–१२ कडील अर्जाप्रमाणे दि.१०/०६/२०२२ रोजी पारित झालेल्या आदेशाप्रमाणे सदरची रक्कम या न्यायालयाचे दि.१३/०६/२०२२ रोजीचे जा.क्रं. ३८०/२०२२ च्या पत्राप्रमाणे अदा झाल्याचे दिसुन येते. असेही दिसुन येते की दिनांक २७/७/२०२२ रोजी जाबदार यांनी या न्यायालयाला जावक क्र. ७७३/२०२२ अन्वये पत्र (निशाणी सी–१६) देवून त्यासोबत रक्कम रुपये १,५५,९८०/– चा धनादेश क्र. २३५७८७ दिनांक ७/७/२०२२ जमा केला. सदरची रक्कम तक्रारदाराची उपदान व रजा वेतनापोटी देय असलेली शिल्लक रक्कम म्हणून जमा केल्याचे दिसुन येते. तक्रारदाराने निशाणी यु–१७ कडे प्रस्तुतची रक्कम मिळावी म्हणुन अर्ज दिला असता त्याअर्जावर दि.२७/०९/२०२२ रोजी आदेश होवून त्याप्रमाणे सदरची रक्कम तक्रारदाराला निशाणी ओ–४ प्रमाणे जा.क्र. ५८०/२०२२ अन्वये अदा करण्यात आलेली आहे. त्यानंतर जाबदार यांनी दिनांक १९/०७/२०२२ रोजी जा.क्र.

७४८/२०२२ या क्रमांकाचे पत्र देवून तक्रारदाराची उपदान व रजा रोखीकरणापोटी देय रक्कम स्वीकार करुन घेण्याबाबत विनंती केली आणि त्याद्वारे असे कळविले की दिनांक २/५/२०१९ रोजी तक्रारदाराच्या भारतीय स्टेट बॅंक, शाखा औसा खात्यावर ग्रॅच्युटी व रजा रोखीकरणाच्या रकमेपैकी रक्कम रुपये १,००,०००/— जमा करण्यात आली आहे. दिनांक १६/३/२०२० रोजी ग्रॅच्युटी व रजा रोखीकरण रकमेपैकी रक्कम रुपये ८०,०००/— तक्रारदाराच्या भारतीय स्टेट बॅंक, शाखा औसा खात्यावर जमा केलेली आहे, दिनांक १५/१०/२०२० रोजी ग्रॅच्युटी व रजा रोखीकरणाच्या रकमेपैकी रक्कम रुपये ५०,०००/— तक्रारदाराच्या भारतीय स्टेट बॅंक, शाखा औसा खात्यावर जमा केलेली आहे दिनांक २१/७/२०२० रोजी ग्रॅच्युटी व रजा रोखीकरणाच्या रकमेपैकी रक्कम रुपये २,००,०००/— तक्रारदाराच्या भारतीय स्टेट बॅंक, शाखा औसा खात्यावर जमा केलेली आहे, दिनांक ८/२/२०२२ रोजी रक्कम रुपये १,०७,०००/— तक्रारदाराने नगरपालिका कर्मचारी पतसंस्थेकडुन कर्ज घेतल्यामुळे त्या पतसंस्थेची थकीत कर्ज रक्कम कपात करुन पतसंस्थेत कर्जाची रक्कम देण्यात आली. दिनांक २८/२/२०२२ रोजी ग्रॅच्युटी व रजा रोखीकरणाच्या रकमेपैकी रक्कम रुपये २,००,०००/— धनादेश / डी. डी. ने न्यायालयात जमा केली आहे. दिनांक ४/४/२०२२ रोजी ग्रॅच्युटी व रजा रोखीकरणाच्या रकमेपैकी रक्कम रुपये २,००,०००/— न्यायालयात जमा केली आहे. दिनांक ७/७/२०२२ रोजी रक्कम रुपये १,५५,९८०/— न्यायालयात जमा केली आहे. अशाप्रकारे तक्रारदाराला ग्रॅच्युटीची रक्कम रुपये ६,३३,०००/— अधिक रजा रोखीकरणाची

रक्कम रुपये ४,५९,९८०/— याप्रमाणे रक्कम रुपये १०,९२,९८०/— अदा करण्यात आलेली आहे.

१६. त्यानंतर असे दिसुन येते की जाबदारने या न्यायालयाला दिनांक ७/२/२०२३ रोजी निशाणी सी—१९ प्रमाणे पत्र देवून कळविले की महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार सेवानिवृत्तीनंतरच्या पुढील पंधरा वर्षाच्या कालावधीत दरमहा समान हप्त्यात रक्कम कपात करण्याची तरतुद आहे. तसेच, या पंधरा वर्षाच्या कालावधीत सदर सेवानिवृत्त कर्मचारी मयत झाल्यास मयत झालेल्या दिनांकापासून सदर पेन्शन विक्री कपात बंद करण्यात येईल अशी तरतुद आहे. त्यानुसार संबंधित सेवानिवृत्त कर्मचा—यास पेन्शन विक्री रक्कम दयावयाची असल्यास संबंधिताची पेन्शन विक्रीची रक्कम कपात न करता त्यांना पुर्ण सेवा निवृत्तीचे रक्कम अदा करण्यात आलेली आहे. दिनांक ३०/४/२०१९ रोजी सेवानिवृत्त झाल्यापासून जादा रक्कम प्रदान झाली असल्याने दिनांक ३०/४/२०१९ पासून आजतारखेपर्यंत देण्यात आलेली रक्कम माहे मे २०१९ ते जानेवारी २०२३ पर्यंत दरमहा ८,४४०/— रुपये पेन्शन विक्री कपात करणे बाकी आहे. त्यानुसार सेवानिवृत्त कर्मचा—याचे मे २०१९ ते जानेवारी २०२३ पर्यंत ८,४४०/— प्रमाणे एकुण ४५ महिन्याचे वेतन देण्यात आलेले पेन्शन विक्री रक्कम ३,७९,८००/— कपात करुन उर्वरित रक्कम रुपये ४,६८,०१५/— या न्यायालयात भारतीय स्टेट बॅक, शाखा औसा धनादेश क्रमांक २३७८८ द्वारे जमा करीत आहे.

१७. तक्रारदाराने निशाणी यु—१८ कडे दि.१५/०२/२०२३ रोजी अर्ज देवून जाबदार यांनी धनादेश क्र. २३७८८ अन्वये जमा केलेली रक्कम रुपये ४,६८,०१५/— मिळावी म्हणून मागणी केली असता सदरची रक्कम त्या अर्जावरील दिनांक २४/०२/२०२३ च्या आदेशाप्रमाणे तक्रारदाराला निशाणी ओ—७ प्रमाणे अदा करण्यात आलेली आहे.

१८. जाबदार नगर परिषदेने निशाणी सी—२० कडील दि. ०८/०४/२०२४ च्या पत्रानुसार या न्यायालयात तक्रारदाराची निवृत्तीवेतन अंशराशीकरण माहे मे—२०१९ ते जानेवारी—२०२३ एकूण पंचेचाळीस महिन्याची कपात रक्कम रुपये ३,७९,८००/— आय.सी. आय.सी.आय बॅक, शाखा औसा वरील धनादेश कं. ०००७७२ दि. ०८/०४/२०२४ अन्वये या न्यायालयात जमा केली असता, सदरची रक्कम तक्रारदाराने निशाणी यु—२३ कडे अर्ज दिला असता त्यावरील दि.२२/०४/२०२४ च्या आदेशाप्रमाणे सदरची रक्कम तक्रारदाराला या न्यायालयाचे पत्र जा.कं. २५६/२०२४ दि.०२/०५/२०२४ अन्वये अदा झाल्याचे दिसुन येते.

१९. तक्रारदाराने त्याच्या निशाणी यु—२५ कडील उलटतपासामध्ये कबुल केले आहे की त्याला सेवानिवृत्तीनंतर जाबदार यांच्याकडुन रक्कम रुपये १८,००,०००/— आणि काही रक्कम मिळाली आहे. त्याला जाबदारकडुन रक्कम रुपये

१,०७,०००/— येणे आहे. त्याने उलटतपासात मान्य केले आहे की, त्याने कर्मचारी पतसंस्थेकडुन कर्ज घेतले होत. ज्यामध्ये मुख्याधिकारी, नगरपरिषद औसा यांनी जामीन म्हणून हमी दिली होती. त्याने उलटतपासात असेही कबुल केली की त्याला पतसंस्थेकडुन असे समजले की रक्कम रुपये १,०७,००० मुख्याधिकारी नगरपरिषद औसा यांनी त्याच्या कर्जापोटी पतसंस्थेमध्ये जमा केले आहेत. पतसंस्थेकडुन त्याला थकीत कर्जाबाबत कोणतीही नोटीस आली नाही आणि कर्ज परतफेडीबद्दल त्याला पतसंस्थेने कोणतीही पावती दिली नाही असेही त्याने उलटतपासात सांगितले. पतसंस्था त्याला पावती का देत नाही याचे कारण त्याला माहित नसल्याचे त्याने सांगितले. नगरपरिषदेने त्याच्या कर्जापोटी रक्कम रुपये १,०७,०००/— जमा केले म्हणून नगरपरिषदेकडुन आता कोणतीही रक्कम येणे लागत नाही ही बाब त्याने नाकारली आहे. परंतु त्याचवेळी त्याने मान्य केले आहे की जर पतसंस्थेने त्याला रुपये १,०७,०००/— नगरपरिषदेकडुन मिळाल्याबाबतची पावती दिली तर त्याचे रुपये १,०७,०००/— नगरपरिषदेकडुन येणे राहणार नाही व त्या पैशाबद्दल त्याची तक्रार नाही.

२०. जाबदारांनी निशाणी सी—३० कडे तपासलेल्या साक्षीदाराने असे सांगितले आहे की तो नगरपरिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादीत, औसा या पतसंस्थेत सचिव म्हणून २००५ पासून कार्यरत आहे. या पतसंस्थेकडुन तक्रारदाराने तो नगरपरिषदेत चालक म्हणून नोकरीला असताना रुपये २,५०,०००/— कर्ज घेतले होते. तो

सेवानिवृत्त झाला त्यावेळी त्या कर्जापोटी त्याच्याकडुन रक्कम रुपये १,०७,०००/— येणे बाकी होती आणि सदर रकमेबाबत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना कळविले असता त्यांनी सदरची रक्कम पतसंस्थेकडे आर.टी.जी.एस. ने वर्ग केली आहे. त्या अनुषंगाने या साक्षीदाराने निशाणी सी—२७ च्या यादीसोबत व्हौचर असल्याचे सांगितले. या साक्षीदाराने असे सांगितले की सदरची रक्कम पतसंस्थेच्या जिल्हा बॅकेतील खात्यावर दिनांक १०/२/२०२२ रोजी जमा झाली आहे. या अनुषंगाने ना देय प्रमाणपत्र देखील दिले असल्याचे या साक्षीदाराने सांगितले. या साक्षीदाराच्या साक्षीमध्ये निशाणी सी—२७ कडील कागदपत्र म्हणजे दिनांक ८/२/२०२२ रोजीचे खर्चाचे बील, कार्यालयीन टिपणी, मुख्याधिकारी नगरपरिषद, औसा यांना ८/२/२०२२ रोजी दिलेल्या पत्राची प्रत, बॅकेचा खातेउतारा, जिल्हा बॅकेतील खात्याचा खातेउतारा आणि ना देय प्रमाणपत्र या कागदपत्रांना अनुक्रमे निशाणी सी—३१ ते सी—३६ असे देण्यात आले आहे. या साक्षीदाराच्या उलटतपासाचे अवलोकन करता या साक्षीदाराने पतसंस्थेचा कर्जाचा खातेउतारा दाखल नाही, कर्जाची रक्कम चलन तीन प्रतीत करुन जमा करावी लागते आणि रक्कम रुपये १,०७,०००/— तक्रारदाराच्या कर्जखात्यावर जमा झाली या अनुषंगाने असलेल्या स्टेटमेंटमध्ये तक्रारदाराच्या नावाची नोंद नाही आणि खातेनंबरही नाही असे सांगितले आहे. या अनुषंगाने निशाणी सी—३५ कडील खातेउतारा पाहता त्यामध्ये दिनांक १०/२/२०२२ रोजी रक्कम रुपये ६,८२,०००/— नगरपालिका कर्मचारी पतसंस्था मर्यादीत औसा यांच्या खात्याला जमा झाल्याची नोंद आहे. जाबदाराच्या साक्षीदाराने असे

सांगितले आहे की या एकुण जमा झालेल्या रक्कमेपैकी तक्रारदाराच्या कर्जाची रक्कम रुपये १,०७,०००/— इतकी आहे. निशाणी सी—३६ कडे नगरपरिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेने २२/२/२०२४ रोजी दिलेल्या ना—देय प्रमाणपत्राची प्रत आहे. त्यामध्ये स्पष्ट नमुद आहे की तक्रारदार दिनांक ३०/४/२०१९ रोजी सेवानिवृत्त झाला त्यावेळी त्याच्यावर पतसंस्थेचे रुपये १,०७,०००/— कर्ज बाकी होते. ते कर्ज बाकी दिनांक ८/२/२०२२ रोजी त्याने फेडले आहे आणि आज रोजी कोणतेही कर्ज व व्याज रक्कम बाकी नाही. या ना—देय प्रमाणपत्र मिळाल्याबाबत तक्रारदाराची सही व तारीख दिसुन येते. तक्रारदाराने त्याच्या उलटतपासात वर नमुद कर्जाची थकबाकी रक्कम मान्य केलेली आहे. ती रक्कम नगरपरिषदेने पतसंस्थेमध्ये जमा केल्याबाबत त्याला माहिती असल्याचे देखील नमुद केले आहे. त्याचबरोबर नगरपरिषदेने त्याच्या पतसंस्थेच्या कर्जापोटी वरीलप्रमाणे रक्कम रुपये १,०७,०००/— जमा केल्यामुळे नगरपरिषदेकडुन त्याला कोणतीही रक्कम येणे लागत नाही अशीही कबुली दिली आहे. सबब, या सर्व बाबींवरुन हे स्पष्ट आहे की प्रस्तुतची तक्रार दाखल झाल्यानंतर तक्रारदाराला त्याने मागितलेली कायदेशीर देणी अदा करण्यात आली आहे. जाबदार नगरपरिषदेने तक्रारदाराच्या कर्जापोटी पतसंस्थेत जमा केलेली रक्कम रुपये १,०७,०००/— ही जाबदार नगरपरिषदेने बेकायदेशीररित्या कपात केली असे तक्रारदाराचे कथन नाही. सदर प्रमाणे रक्कम कपात करुन तक्रारदाराच्या कर्ज खात्यात जमा केल्याचे बाब तक्रारदाराच्या ज्ञानात असतानाही त्याने त्या अनुषंगाने तक्रारीमध्ये काहीही नमुद केले नाही अगर तक्रार दुरुस्ती करुन घेतलेली नाही.

त्यामुळे जाबदार नगरपरिषदेने बेकायदेशीररित्या रक्कम कपात केली आणि ती रक्कम तक्रारदाराला येणे आहे हा तक्रारदारातर्फे केलेला युक्तिवाद स्वीकारण्याजोगा नाही.

२१. तक्रारदाराने थकीत रकमेवर द.सा.द.शे. १८ टक्के दराची मागणी केली आहे. परंतु तक्रारदाराने या अनुषंगाने त्याच्या सेवाशर्ती मधील कोणतीही तरतुद दर्शवून दिलेली नाही. त्यामुळे तक्रारदाराची व्याजाची मागणी मान्य करता येणार नाही.

२२. सबब, मुद्दा क्र.२ बाबत निष्कर्ष की तक्रारदाराला वर नमुद केल्याप्रमाणे आणि त्याने उलटतपासात दिलेल्या कबुलीप्रमाणे त्याच्या थकीत रकमा त्याला अदा झालेल्या आहेत. अशा परिस्थितीत त्या अनुषंगाने तक्रारदार कोणतीही दाद मिळण्यास पात्र नाही. येणेप्रमाणे मुद्दा क्र. २ चे निष्कर्ष नोंदविण्यात येत आहेत.

२३. तक्रारदाराला जाबदार यांनी सेवानिवृत्ती नंतर विनाविलंब त्याच्या सेवानिवृत्तीमुळ प्राप्त होणा—या कायदेशीर रकमा अदा करणे आवश्यक होते त्यामुळे जाबदार यांनी अनुचित कामगार प्रथा केली आहे असा निष्कर्ष नोंदवला असला तरी तक्रारदाराला त्याच्या रकमा अदा झाल्यामुळे आता केवळ हक्कज्ञापनाचा आदेश करणे उचित होणार नाही. परिणामी मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदाराला त्याच्या सेवानिवृत्तीमुळे देय होणा—या रकमा प्रस्तुत तक्रारीच्या सुनावणी दरम्यान अदा झाल्याने तक्रारदार हक्कज्ञापन अगर अन्य दाद मिळणेस पात्र ठरत नसल्याने तक्रार बंद करण्यात आली.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by SHASHIKANT DNYANDEV BAUCHKAR
Date: 2026.08.07 17:28:05 +0530

( श.ज्ञा. बाऊचकर )
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, लातूर

दिनांक — ०७/०८/२०२६
ठिकाण लातूर.

| | | |
|---|---|---|
| युक्तीवाद पुर्ण केल्याची तारीख | : | २८.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय जाहीर तारीख | : | ०७.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय तयार तारीख | : | संगणकावरती प्रत्यक्षात सांगितल्याने श्रुतलेखक घेऊन टंकलेखन नाही. |
| न्यायनिर्णय तपासला व सही केली | : | ०७.०८.२०२६ |